ISBN-978-81-951099-0-6

# Current Trends in Humanities & Commerce

**Peer-Reviewed Book Chapter**

Prof. Virag.S.Gawande
**Chief Editor :**
Dr.Dinesh W.Nichit
**Editor :**

**Published By**

**Aadhar International Publications**
**Amaravati**

ISBN-978-81-951099-0-6

**Current Trends In Humanities & Commerce**

Prof. Virag.S.Gawande
Dr. Dinesh W.Nichit

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means without permission. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

*First published, **February , 2021***

AADHAR PUBLICATIONS,
Amravati.

ISBN - **978-81-951099-0-6**

**Published by**
Prof. Virag Gawande for
Aadhar Publications,
Behind Govt. VISH,
New Hanuman Nagar,
Amravati – 444 604.

**Printed by**
Sarita Graphics,
Amravati
Price-350

ISBN-978-81-951099-0-6



| | | |
|---|---|---|
| | **Dr. P. H. Pendharkar** | |
| 15 | Human Rights Of The Elderly Persons In India: A Humanitarian Perspective **Mr. Swapnil Rajeshrao Sonare** | 156 |
| 16 | संत तुकारामांचा साहित्यनिर्मिती विषयक दृष्टिकोन डॉ. सुधाकर वि. ुयार | 164 |
| 17 | (कोविड–१९) महिला नेतृत्वाचा दृष्टीकोन एक अभ्यास डॉ. किरण राजेंद्र बेलुरकर | 174 |
| 18 | ग्रामीण विकासात शाश्वत शेतीचे महत्व डॉ.व्यंकटेश काळुराम मदनुरे | 182 |
| 19 | भारतीय शेती आणि कंत्राटी शेती प्रा. डॉ. टी. एम. गुरनुले | 191 |
| 20 | गांधीजींच्या विश्वस्त संकल्पनेची प्रस्तुतत: प्रा.डॉ.महादेव बेलखेडे | 199 |
| 21 | मानव्य आणिसामाजिक विज्ञानासमोरील समस्या आणि उपाय प्रा.पराग गावंडे | 209 |
| 22 | जागतिकीकरण खाजगीकरण व उदारीकरणाचा भारतीय राज्यव्यवस्थेवरील प्रभाव प्रा.डॉ. अशोक जाधव | 215 |
| 23 | महिला लेखिका मालती जोशी के कथा साहित्य में सामाजिक यथार्थ प्रा.डॉ.मस्तान शाह | 219 |
| 24 | राजा राममोहन राय यांचे सामाजिक कार्य प्रा. डॉ. क्षिरसागर बी.एस. | 227 |
| 25 | पंडित जवाहरलाल नेहरू व लोकशाही शासन पध्द्ती डॉ विजय मु. गावंडे | 238 |

ISBN-978-81-951099-0-6

# राजा राममोहन राय यांचे सामाजिक कार्य

**प्रा. डॉ. क्षिरसागर बी.एस.**
इतिहास विभाग प्रमुख शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.
Mob. No. 9850864010 E-Mail- drkbs003@gmail.com

---

प्रस्तावना:

युरोप खंडात आधुनिकतेला व प्रबोधनास १६ व्या शतकामध्ये सुरुवात झाली. परिणामतः युरोपात अनेक नवनवीन शोध लागू लागले. झपाट्याने युरोपीय देशांची सर्वच क्षेत्रात प्रगती झाली. या प्रगती बरोबरच वसाहतवाद साम्राज्यवाद व सत्ता स्थापनेच्या स्पर्धेला सुरुवात झाली. या हेतूनेच भारतात युरोपियन सत्तांचे आगमन झाले. डच, पोर्तुगीज, फ्रेंच, व इंग्रज यांचा यामध्ये समावेश होतो. इंग्रजांनी १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना करून, १९ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकापर्यंत संपूर्ण भारतावर आपली सत्ता प्रस्थापित केली. भारतात राज्य करीत असताना ब्रिटिशांनी निर्माण केलेली महसूल व्यवस्था, कर पद्धती, शिक्षण व्यवस्था, ज्ञानव्यवस्था विज्ञाननिष्ठा व कायद्यावरील श्रद्धा भारतीयांना अचिंबित करणाऱ्या होत्या. हा नवा बदल भारतीय समाजाला प्रभावी वाटला. त्याकाळी भारतीय समाजात अस्पृश्यता, अज्ञान, अंधश्रद्धा, जातीभेद, निरक्षरता, लोकभ्रम, सतीची चाल, बालकन्यावध, बालविवाह, धर्मभोळेपणा, दारिद्र्य, बालविधवांचे प्रश्न, पुनर्विवाह, उच्च-नीचता, अशा अनिष्ट प्रथांचा शिरकाव झाला होता. या प्रथा भारतीयांच्या प्रगतीमधील मोठा अडसर आहे. हे तत्कालीन समाज सुधारकांच्या लक्षात आले. त्यामुळेच भारतीय समाज सुधारकांनी पाश्चात्य संस्कृती पासून बुद्धिवाद, विज्ञाननिष्ठा, समता, बंधुत्व व स्वातंत्र्याची मूल्य आत्मसात केली. व भारतामध्ये प्रबोधनाची चळवळ उभी केली. ·कारण पाश्चात्य विद्या संपादन केल्याशिवाय समाजाची भौतिक प्रगती होणार नाही, ही सत्यता तत्कालीन समाज

सुधारकांच्या लक्षात आली, अनेक समाज व धर्म सुधारकांनी आधुनिकीकरणाला गती मिळावी यासाठी समाज जागृती केली. या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीमध्ये राजा राममोहन रॉय अग्रेसर होते. भारतातील समाज सुधारणा आणि धर्म सुधारणा चळवळीचे ते "आद्य प्रवर्तक" होते. भारतीय समाज सुधारकांमध्ये राजा राममोहन रॉय यांचे कार्य मोठे आहे. त्यामुळेच त्यांना भारतीय सामाजिक व धार्मिक प्रबोधनाचे "अग्रदूत", "जनक" म्हटले जाते.

**राजा राम मोहन राय यांचे जीवन चरित्र:**

आधुनिक भारताचे जनक म्हणून राजा राम मोहन रॉय यांना इतिहासामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. बंगालमधील हुबळी जिल्ह्यातील "राधानगरी" या गावी दिनांक २२ मे १७७२ रोजी एका ब्राह्मण कुटुंबामध्ये राजा राममोहन रॉय यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रमाकांत रॉय व आईचे नाव तारिणीदेवी असे होते. खरे म्हणजे मोहनरॉय यांचे मूळ आडनाव बॅनर्जी होते. परंतु पंजोबा बंगालच्या नवाबाच्या सेवेत रुजू असल्याने तेथे त्यांना रॉय या उपाधीने सन्मानित करण्यात आल्यामुळे पुढे त्यांना रॉय या अडनावाने ओळखले जाऊ लागले. राजा राम मोहन रॉय यांचे प्रारंभिक शिक्षण हे त्यांच्या गावीच झाले. पुढे उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी त्यांच्या वडिलांनी पर्शियन व अरेबिक भाषेची सखोल ज्ञान देणाऱ्या पाटणा व बनारस या केंद्रामध्ये त्यांना पाठविले. तेथे त्यांनी पारसी, बंगाली, हिंदी, अरबी, इंग्रजी, भाषेचे ज्ञान अवगत केले. हिंदू धर्माबरोबरच त्यांनी मुस्लिम धर्माचाही अभ्यास केला. खरे म्हणजे लहानपणापासूनच राजाराम मोहन रॉय यांना समाजामध्ये असलेल्या अनिष्ट प्रथांबद्दल चीड निर्माण झाली होती. वयाच्या सोळाव्या वर्षीच त्यांनी घर सोडून तिबेट येथे बौद्ध धर्माचा अभ्यास केला. संपूर्ण शिक्षण झाल्यानंतर १८०५ ते १८१४ पर्यंत ते ईस्ट इंडिया कंपनीत एक महसूल अधिकारी जॉन डीग्बी यांचे सहाय्यक म्हणून रुजू झाले. त्या ठिकाणी लिपिक व दिवाण म्हणून त्यांना बढती मिळाली. पुढे त्यांनी ही नोकरी सोडली. आणि ते कलकत्त्याला राहायला गेले. पुढील आयुष्य लोककल्याणासाठी, बंगालमधील

ISBN-978-81-951099-0-6

जनतेच्या सेवेसाठी अर्पण केले. १८१४ मध्ये याच हेतूने त्यांनी आत्मीय सभेची स्थापना केली. पुढे २० ऑगस्ट १८२८ मध्ये ब्राह्मो समाजाची स्थापना केली. ब्राह्मो समाजाच्या मार्फतच राजाराम मोहन रॉय यांनी सामाजिक व धार्मिक चळवळीस सुरुवात केली. दिल्लीचा मुगल सम्राट अकबर दुसरा यांनी राजाराम मोहन रॉय यांना "राजा" ही पदवी देऊन गौरविले होते. म्हणूनच त्यांना "राजा" राममोहन रॉय या नावाने ओळखली जाते.

आत्मीय सभा:

राममोहन रॉय यांना सर्व धर्माविषयी आदरभाव होता. परंतु समाजातील अनिष्ठ प्रथांचा मात्र त्यांनी विरोध केला. बालविवाह, मूर्तिपूजा, कर्मकांड, सतीप्रथा त्यांना मान्य नव्हत्या. अशा अनिष्ट चालीरीतींना पायबंद घालावा यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. त्यांच्या मते स्त्री व पुरुष समान आहेत. म्हणून समान विचार असणाऱ्या लोकांना एकत्र करून १८१५ मध्ये कोलकत्ता येथे राजा राम मोहन रॉय यांनी "आत्मीय सभा" या नावाची एक संघटना स्थापन केली. आत्मीय सभा म्हणजेच "मित्रांचा समूह" होय. या मित्रांच्या सहकार्याने या संघटनेमार्फत समाजातील अनिष्ट प्रथा बंद करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

ब्राह्मो समाजाची स्थापना:

आत्मीय सभेच्या स्थापनेनंतर २० ऑगस्ट १९२८ रोजी राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली. ब्राह्मो समाज म्हणजे लोकांचा जनसमुदाय होय. समाज सुधारण्याचे कार्य करण्यासाठी एखादे प्रार्थना स्थळ असावे, या हेतूने रामकमल बासू यांच्याकडून एक इमारत भाड्याने घेऊन या इमारतीमध्ये हे प्रार्थना स्थळ सुरू करण्यात आले. या प्रार्थना स्थळालाच पुढे ब्राह्मोसभा असे नाव देण्यात आले. ब्राह्मोसभा या नावाचेच "ब्राह्मो समाज" असे नामकरण करण्यात आले.

ब्राह्मो समाजाची तत्वे: ब्राह्मो समाजाची तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१. ईश्वर एकच असून तो सृष्टीचा निर्माता व रक्षक आहे.

ISBN-978-81-951099-0-6

२. एकेश्वरवाद हाच सत्याचा मार्ग आहे.

३. आत्मा अमर आहे.

४. मूर्तीपूजा व कर्मकांडामुळे ईश्वर भक्ती होत नाही.

५. मानव जातीवर प्रेम करणे, हीच खरी ईश्वर भक्ती आहे.

६. अध्यात्मिक प्रगतीसाठी ईश्वराची प्रार्थना व त्यावर श्रद्धा ठेवणे, आवश्यक आहे.

७. अवतारवादाच्या सिद्धांतावर या समाजाचा विश्वास नाही.

८. ब्राम्हो समाज सर्व धर्माचा आदर करतो. कोणाची निंदा करीत नाही.

९. मंदिर व तीर्थस्थानाला ब्राह्मो समाज महत्त्व देत नाही.

मानव जातीवर प्रेम, सर्वांचा उदय, सर्वांचा विकास, स्त्री-पुरुष समानता या ध्येयाला समोर ठेवून समाजसेवा करणे, हे उद्दिष्टे ब्राम्हो समाजाची आहे.

**राजा राममोहन रॉय यांनी केलेले सामाजिक कार्य:**

तत्कालीन भारतीय समाज पिढ्यान-पिढ्या चालत आलेल्या अनिष्ट रूढी-परंपरा, कर्मकांड, भूत-पिशाच्च, भानामती, मंत्र-तंत्र इत्यादी भ्रमक परंपरेला चिकटलेला होता. सोबतच समाजामध्ये बालविवाह, अंधश्रद्धा, जातीव्यवस्था, बहुपत्नी विवाह, हुंडा पद्धती, विधवाविवाह बंदी, सती प्रथा इत्यादी जाचक प्रथांनी समाजाला पूर्ण ग्रासले होते. या प्रथांपासून समाजाची सुटका व्हावी. म्हणून राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाच्या मार्फत आधुनिक समाज निर्मितीचे कार्य केले.

सतीप्रथा विरोध:

पतीच्या निधनानंतर पत्नीने तिची इच्छा असो अथवा नसो तरीही पतीवरोबर चितेत उडी घेऊन जीव देणाऱ्या पत्नीस "सती" म्हटले जात असे. या प्रथेला हिंदू समाजामध्ये कुठलेही स्थान नाही, आधार नाही. हे पटवून देण्याचे कार्य राजा राममोहन रॉय यांनी केले. परंतु तरीही पाहिजे तसे यश सुरुवातीला त्यांना मिळाले नाही. १८११ साली त्यांच्याच घरामध्ये सती जाण्याचा प्रसंग उद्भवला, त्यावेळी त्यांनी आपल्या भावाच्या पत्नीचे सती जाण्यापासून परावृत्त करण्याचा खूप

ISBN-978-81-951099-0-6

प्रयत्न केला, परंतु तो यशस्वी झाला नाही. यामुळे त्यांचे मन हेलावून गेले. सती जाण्यास एखाद्या स्त्रीला भाग पाडणे, म्हणजे एक प्रकारचा तिचा खूनच होय. असे त्यांनी मत मांडले. त्यांनी प्रथम सती प्रथेविरुद्ध आवाज उठविला. तदनंतर १८१८ पासून सती प्रथेसारख्या अनिष्ट प्रथेविरुद्ध जोरदार मोहीम सुरू केली. खूप ठिकाणी त्यांनी भाषने, व्याख्याने देऊन सती प्रथेवर लेख लिहून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. सतीप्रथा बंध करावी म्हणून त्यांनी इंग्रजांकडे विनंती अर्जही केला. शेवटी या अर्जाला यश येऊन तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम वेन्टीग यांनी चार डिसेंबर १८२९ रोजी बंगालमध्ये सतीबंदीचा कायदा पास करून ही प्रथा कायद्याने बंद केली. कायदा जरी इंग्रजांनी केला असला, तरी सती कायदा बंद व्हावा, सतीची प्रथा बंद व्हावी, यासाठी फार मोठे आंदोलन राजा राममोहन रॉय यांनी केल्यामुळेच ब्रिटिशांनी हा कायदा केला. त्यामुळे सतीबंदी कायद्याची संपूर्ण श्रेय हे राजा राममोहन रॉय यांना जाते.

जातीभेदास विरोध:

पूर्वीपासूनच भारतामध्ये असंख्य जाती आहेत. १९ व्या शतकातील भारतीय समाज हा अनेक जाती आणि पंथाच्या बंधनात अडकलेला होता. समाजाच्या प्रगतीच्या आड जातीसंस्था ही सर्वात मोठा अडसर होता. समाजात उच-नीच श्रेष्ठ-कनिष्ठ असे भेदाभेद होते. जातीभेदामुळे हिंदू मीसमाजाची प्रगती झाली नव्हती. म्हणून हिंदू समाजातील जातीभेद नष्ट केला पाहिजे. यासाठी राजा राममोहन रॉय यांनी खूप मोठे कार्य केले. कारण राष्ट्रनिर्मितीच्या आड जात, धर्म, पंथ येतो अशीही मत त्यानी ठामपणे मांडले. हिंदू लोक आजच्या धर्म पद्धतीचे आचरण करीत आहे. ते त्यांच्या राजकीय हिताच्या दृष्टीने बरोबर नाही. जातिभेदामुळेच हिंदूंची राष्ट्रीयभावना नष्ट केली असल्याचे त्यांचे मत होते. त्यामुळेच त्यांनी जाती भेदाविरुद्ध मोठा लढा उभा केला होता.

**स्त्री हक्कासाठी आंदोलन:**

ISBN-978-81-951099-0-6

राजा राममोहन रॉय यांनी स्त्रियांची स्थिती ,सुधारण्यासाठी, स्त्रियांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी, स्त्रियांना संपत्तीवर अधिकार मिळावा, आंतरजातीय विवाह होण्यासाठी खूप मोठा पुढाकार घेतला. कारण तत्कालीन समाजात स्त्रियांची स्थिती ही अत्यंत वाईट होती. त्यांचा दर्जा अत्यंत हीन होता. चूल आणि मूल एवढ्या पुरतेच कार्य स्त्रीचे मर्यादित होते. सर्व अधिकार पुरुषांकडे असल्याने स्त्रियांना मात्र अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले. होते. स्त्रियांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा व्हावी, यासाठी सर्वप्रथम चळवळ उभी करण्याचे काम राजा राममोहन रॉय यांनी केले आहे. समाजामध्ये असलेल्या अनिष्ट प्रथांमुळेच स्त्रियांची परिस्थिती हीन झाली आहे. म्हणून या अनिष्ट प्रथा बंद करण्याच्या दृष्टीने सरकार दरबारी त्यांनी प्रयत्न केले. त्या प्रयत्नांचेच फळ म्हणजे १८२९ मध्ये झालेला सतीबंदीचा कायदा होय. खरे म्हणजे सिंधू संस्कृती पासून ते पूर्व वैदिक कालखंडापर्यंत स्त्रियांचा दर्जा हा उच्च होता. हिंदू धर्मशास्त्रात स्त्रियांना वारसा हक्क होता. पण मध्ययुगीन काळात या हक्काची पुरुषी वृत्तीने पायमल्ली केल्याचे दिसून येते. म्हणून स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळावे, त्यांची गुलामगिरी संपवावी, त्यांना वारसा हक्क मिळावा, बहुपत्नीत्वाची पद्धत बंद व्हावी, यासाठी राजा राममोहन राय यांनी तहयात कार्य केले. स्त्रियांना समाजात समानत्तेची वागणूक द्यावी, बहुपत्नी विवाह पद्धतीस विरोध करून, विधवा विवाहाचा त्यांनी पुरस्कार केला.

**बहुपत्नीविवाहास विरोध:**

समाज व्यवस्थेमध्ये त्याकाळी बहुपत्नीत्वाची प्रथा प्रचलित होती. श्रीमंत व ब्राह्मण लोक एकापेक्षा अनेक बायका करण्यामध्ये अग्रेसर होते. या पद्धतीस बहुपत्नीविवाह असे म्हणत. परंतु स्त्रियांना मात्र दुसरा विवाह करण्यास बंदी होती. त्यामुळे ही प्रथा बंद झाली पाहिजे यासाठी राजा राम मोहन रॉय यांनी या प्रथेला विरोध केला. पतीने दुसरा विवाह केल्यास पहिल्या पत्नी सोडून देण्यात येई. अशावेळी त्या स्त्रीला समाजात कसलेच स्थान नसे. तिचे जीवन अतिशय वाईट असे. हिंदू धर्मग्रंथा नुसार विशिष्ट परिस्थितीत पुरुषाला दुसरा विवाह करण्याची



Shiva College, HINGOL

ISBN-978-81-951099-0-6

परवानगी देण्यात आल्याचे उल्लेख आहेत. खरे तर ह्याच नियम स्त्रियांनाही लागू असावा याचा पुरस्कार राजा राम मोहन राय यांनी केले. परंतु समाजात स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार नसल्यामुळे त्यांनी बहुपत्नीविवाहास सदैव विरोध दर्शविला.

**कायदा व न्याय विषयक सुधारणा:**

राजा राममोहन रॉय हे स्वातंत्र्याची पुरस्कर्ते होते. त्यामुळे तत्कालीन असलेल्या कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी चळवळ उभी केली. वर्तमानपत्रावर कायद्याने लावलेल्या नियंत्रणाविरुद्ध आंदोलन केले. मुद्रणालयावर लावलेल्या निर्बंधावर विरुद्ध उठाव करून त्यांनी त्यासाठी किंग इन कौन्सिल व सुप्रीम कोर्टाला एक अर्ज सादर केला. याशिवाय न्यायाधीश व दंडाधिकारी ही पदे अलग करावी, दिवाणी व फौजदारी कायद्याचे संकलन करावे. नवीन कायदे बनविताना भारतीय वकिलांशी चर्चा करावी, व न्यायालयाची भाषा पारसी एवजी इंग्रजी करणे, याचे त्यांनी समर्थन केले.

**शेतकऱ्यास पाठिंबा:**

जहागीरदार आणि जमीनदार वर्ग कामगार व शेतकरी यांची मिरवणूक करत असत. या वर्गाच्या विरोधात राजा राममोहन रॉय यांनी आवाज उठविला. ते म्हणत शेतकरी व जमीन मालक यांच्यात चांगले संबंध असावेत. जमीनदारांनी खंडणी स्वरूपात वाढवनी करू नये. यासाठी राजा राममोहन रॉय यांनी ब्रिटिश शासनाकडे शेतकऱ्यांचे हक्क, न्याय व संरक्षण हे कायद्याने झाली पाहिजे, अशी शिफारस केली. याशिवाय शेतकऱ्याविरुद्ध होणारे अन्यायास तोड दिले. शेतसारा कमी करण्यासाठी आंदोलन केले. भूमि कायदाविरुद्ध त्यांनी जॉईंट सिलेक्ट कमिटीला निवेदन पत्र ही दिले.

**प्रसारमाध्यमाच्या मार्फत समाज सुधारणा:**

आपले विचार सर्वसामान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी वर्तमानपत्रामार्फत मोठे कार्य केले. त्यांनी संवाद कौमुदी मिरत उल अखबार,



ivaji College, HINGOL

ISBN-978-81-951099-0-6

समाचार चंद्रिका व आत्मीय सभामार्फत त्या काळात बंगाल गॅझेट हे साप्ताहिक प्रकाशित होत असे. या वर्तमानपत्रात त्यांनी विविध लेख लिहिले. त्यांच्या या लेखन कार्यास आणि विचारास सनातनवादी मंडळीकडून प्रखर विरोध होऊ लागला. परंतु त्यांच्या विरोधाला राजा राममोहन रॉय यांनी वर्तमानपत्रातच समर्पक अशी उत्तरे दिली.

**राष्ट्रवादाचा प्रसार व वृत्तपत्र स्वातंत्र्य:**

राजा राम मोहन राय हे वृत्तपत्र स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. परंतु त्याकाळी वर्तमान वर्तमानपत्रांमध्ये फारसी जागृती झालेली नव्हती. राजा राममोहन रॉय यांनी चार डिसेंबर १८२१ रोजी संवाद कैमुदी या नावाचे बंगाली भाषेतील साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाचे संपादक भवानी चरण बॅनर्जी होते. तसेच 1822 मध्ये मिरत उल अखबार या नावाचे दैनिक परिशियन भाषेमध्ये प्रकाशित व संपादित केले. या वर्तमानपत्रातून त्यांनी राष्ट्रीय व राष्ट्रवादी विचारांचा प्रसार केला. इंग्रजांच्या दडपशाही धोरणामुळे त्यांना आपले वर्तमानपत्र बंद करावे लागले. संवाद कैमोदी मिरत उल् अखबार व समाचार चंद्रिका हे त्यांची प्रसिद्ध वर्तमानपत्रे होती. वर्तमानपत्रावर कोणतेही बंधन नसावेत असे त्यांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी 1833 मध्ये वृत्तपत्र नियमांच्या विरोधात जनमत तयार करून तीव्र आंदोलन केले. या आंदोलनामुळेच शेवटी 1835 मध्ये सर चार्ल्स मिटकॉफ या प्रभारी गव्हर्नरला वर्तमानपत्रावर असलेली सर्व बंधने काढून टाकावी लागली.

**इंग्लंडमध्ये केलेले कार्य:**

तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये समुद्रपर्यटन करणे यानिषिद्ध मानले जात असे. परंतु या सामाजिक निषेधाचे उल्लंघन करून आणि समुद्रपर्यटन करून इंग्लंडला जाणारी पहिली भारतीय व्यक्ती म्हणजे राजा राममोहन रॉय होय. इंग्लंड मधील वास्तव्यात त्यांनी तत्कालीन भारतीची राजकीय व न्यायव्यवस्था कथन केली. भारतीयांची परिस्थिती व त्यांच्या मागण्यावर त्यांनी प्रकाश टाकला. त्यांनी



Shivaji College

वृत्तपत्रामार्फत लेख लिहून भारताची प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न केला. आणि ब्रिटिश शासनाला भारतीय प्रश्नांचे स्वरूप काय याची जाणीव करून दिली.

राजा राम मोहन रॉय यांनी आयुष्यभर समाज परिवर्तनासाठी चळवळ उभी करून, भारतीय समाज सुधारणेचा पाया घातला.

**सारांश:**

भारतीय समाजामध्ये आज सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये जे परिवर्तन होत असताना दिसते. त्या पाठीमागे राजा राममोहन रॉय यांचा वाटा सिंहाचा आहे. त्यांनी दाखविलेला सामाजवैज्ञानिक दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा आहे. आधुनिक भारताच्या प्रगतीची इमारत राजा राममोहन रॉय यांच्या विचारावरच मजबूतपणे उभी आहे. राजा राममोहन रॉय यांच्या विचाराचा वारसा पुढे दयानंद सरस्वती, नको, विवेकानंद, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, विपिनचंद्र पाल, गोखले, लोकमान्य टिळक, अरविंद घोष, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, आणि इंदिरा गांधी यांनी पुढे चालविल्याचे दिसून येते. राजा राममोहन रॉय यांनी भारताने आधुनिकतेकडे वाटचाल करावी, या दृष्टिकोनातून अनेक इंग्रज अधिकाऱ्यांचा विरोध केला. राजा राममोहन रॉय एकमेव अशी व्यक्ती आहेत की, ज्यांनी भारताला आधुनिकतेच्या पायवाटेवर घेऊन जाण्याचे वृत्त हाती घेतले होते. हे कार्य करीत असताना ते कधीच डगमगले नाही. भारतिय उपखंडाच्या पूर्वेकडील प्रदेशापासून ते पश्चिमेकडील प्रदेशापर्यंत ते एकमेव व्यक्ती आहेत की ज्यांनी भारताची तत्कालीन स्थिती काय? आणि भारताचे उज्वल भविष्य कशामध्ये आहे हे सर्वसामान्यांना दाखवून दिले होते. राजा राम मोहन रॉय यांचे कार्य यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे की, त्याच्या कार्याचा प्रारंभ हा मध्ययुग आणि आधुनिक युग यांच्या समकालखंडातून झालेला होता. राजा राममोहन रॉय यांनी पाश्चात्य संस्कृतीचे अध्ययन करून, त्यांचा इतिहास काय आहे, याचा सखोल अभ्यास केला होता. युरोपियन राष्ट्राची प्रगती कशामुळे होत आहे, तेथील अर्थव्यवस्था झपाट्याने का वाढत आहे. त्या ठिकाणी एवढे परिवर्तन कशामुळे होत आहे. युरोपमधील हे

क्रांतिकारी परिवर्तन त्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले होते. फ्रान्समध्ये झालेली क्रांती, दक्षिण अमेरिकेमधील मुक्ती आंदोलने या सर्व गोष्टी राजा राममोहन रॉय यांनी स्वतः पाहिल्या होत्या. आणि त्या त्यांच्या ऐकण्यामध्ये सुद्धा आलेल्या होत्या. त्यांचा जन्मच अशा स्थितीमध्ये झाला की, त्यावेळी भारताची परिस्थिती अतिशय विकट होती. संपूर्ण भारत हा वेगवेगळया गटातटामध्ये विभागलेला होता. या सर्व गोष्टींचा अभ्यास केल्यानंतर त्यांनी भारताच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उत्थानासाठी आपले सर्व जीवन अर्पण केले.

राजा राममोहन रॉय हे खरे मानवतावादी होते. ते स्वातंत्र्याची पुरस्कर्ते होते. स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा आनण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. इंग्लंडचा राजा विल्यम चौथा व फ्रांचा राजा लुई फिलीपी यांनी त्यांचा सन्मान केला होता. ते सनदशीर, राजकीय आंदोलनाचे समर्थक होते. त्यांनी भारतीय प्रशासन सुधारण्यासाठी प्रयत्न केले. आधुनिक युगाचे जनकही त्यांना म्हटले जाते. ते धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, साहित्य व राष्ट्रीय आंदोलन या सुधारणांचा प्रारंभ करणारे पहिले भारतीय नेते होते. राजा राममोहन रॉय हे एक महान सुधारक, धर्मप्रवर्तक, राजनीतितज्ञ, शिक्षणतज्ञ, साहित्यिक, पत्रकार, तत्ववेत्ते व तत्त्वज्ञानी होते. अशा या महान, थोर व्यक्तीचा मृत्यू २७ फेब्रुवारी १८३३ मध्ये इंग्लंड मधील ब्रिस्टॉल येथे अल्पशा आजाराने झाला.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. डोळे. ना. य. 1969. राजकीय विचारांचा इतिहास. पुणे. कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

२. वेहेरे. ना.के. 1857, भारत गौरव ग्रंथ माला. मुंबई.

३. सुमेन्द्रनाथ टागोर. भारतीय साहित्याचे निर्माते राजा राम मोहन रॉय, साहित्य अकादमी.

४. Tagure. saumyendranath., Raja rammohan Roy, 1973, New Delhi- publication division.



Shivaji College

ISBN-978-81-951099-0-6

५. Desai. A. R., social background of Indian nationalism, 1989, fifth edition, reprint,
Bombay, popular Prakashan

६. India's struggle for independence visual and documents, New Delhi, NCERT.



Shivaji College,